महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/10/2023 (शनिवार) सकाळ

---

**पोलिस स्टेशन मौदा अपराध कमांक ९२७/२३ कलम ३७९, ३४, १०९ भादवि सहकलम ४८ (८) महसुल अधिनियम अन्वये मा. पोलिस अधिक्षक वि.प.नागपुर ग्रामिणची अवैधरित्या रेतीची चोरी करून वाहतुक करतांना मिळुन आल्याने ५ ईसमावर कार्यवाही करून १५ ब्रास रेतीसह दोन ट्रक व मोबाईलसह एकुण ५१,१२,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त**

दिनांक ११/१०/२०२३ रोजी सहायक पोलीस निरीक्षक अमित पांडेय, पोलीस हवालदार निलेश बिजवाड, पोलीस अंमलदार निखील मिश्रा यांचेसह फिर्यादी मा. पोलिस अधिक्षक साहेब नागपुर ग्रामिण यांचे आदेशांन्वये नागपुर ग्रामिण हद्दीमध्ये अवैद्य धंद्यावर रेडकामी खाजगी वाहनाने मौदा परीसरात फिरत असतांना सपोनि. अमित पांडेय यांना मुखबिरद्वारे खबर मिळाली कि, भंडारा ते नागपुर रोडने काही ट्रकमालक विना परवाना आपले ट्रकद्वारे विना परवाना रेतीची चोरटी वाहतुक करणार आहे. यावरून सिंगोरी शिवारात दिनांक १२/१०/२०२३ चे पहाटे ०५.३० वा. दरम्यान रोडवर उभे असतांना समोर ट्रक क्र. एम.एच. ४०/ बी.एल— १९४९ व ट्रक क्र. एम.एच. ४९/बी.झेंड—५१६४ असे दोन ट्रक एका मागे एक रेतीने भरून समोरून येत असल्याचे दिसल्याने व त्यावर संशय आल्याने त्यांना थांबवुन दोन्ही चालकांना मौदा पोलीसांनी येण्याचा उद्देश सांगून ट्रक क्र. एम. एच. ४०/ बी.एल— १९४९ चे चालकाला त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी आपले नाव सचिन भोंदुजी वांढरे वय ३१ वर्ष रा. वाडी मोहल्ला जाखेगाव मौदा ता. कामठी जिल्हा नागपुर असे सांगितले. पंचासमक्ष ट्रकाची पाहणी केली असता सदर ट्रकमध्ये निळया रंगाच्या पल्ल्यांमध्ये पुर्णपणे रेती भरून असल्याचे दिसल्याने त्याबाबत ट्रक चालक सचिन भोंदुजी वांढरे वय ३१ वर्ष रा. वाडी मोहल्ला जाखेगाव मौदा ता. कामठी जिल्हा नागपुर यांना रेतीचे परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने सदर ट्रक क. ट्रक क्र. एम.एच. ४०/बी.एल— १९४९ हा रामचंद्र शाहु रा. माथनी ता. मौदा जिल्हा नागपुर यांचा असुन त्याचे सांगणेवरून मोहगाव देवी ता. माहोडी जिल्हा भंडारा येथुन रेती विनापरवाना वडोदा येथे घेवुन येत होतो असे सांगितले. तसेच मागे असणारा ट्रक क्र. एम.एच. ४९/ बी.झेड—५१६४ चे चालकाला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव अर्जुन पप्पु जाधव वय ४२ वर्ष रा. प्लॉट नं. २९ नविन नगर पारडी नागपुर असे सांगितले व क्लिनर याने आपले नाव प्रमोद प्रकाश पवार, वय २१ वर्ष रा. नविन नगर पारडी नागपुर असे सांगितले. ट्रकातील रेतीबाबत विचारपुस केली असता चालकाने ट्रक क्र. एम.एच. ४९/ बी.झेड—५१६४ हा विनोद शेषराव भोयर रा. भरत नगर नागपुर यांचा असुन त्यांचे सांगणेवरून गोबरवाही ता. तुमसर जिल्हा नागपुर येथुन साठा केलेली १० ब्रास रेती विना परवाना नागपुरला घेवुन येत होतो असे सांगितले. आरोपीतांच्या ताब्यातून ट्रक क. एम.एच. ४०/बी.एल— १९४९ च्या चालकाचे ताब्यातुन १) ०६ ब्रास रेती विनापरवाना किमंती ३६०००/— रु २) ट्रक क. एम.एच. ४०/बी.एल— १९४९ किमती १०,००,०००/—रु ३) रेडमी १० कंपनीचा ग्रे रंगाचा मोबाईल ज्यामध्ये जियो कंपनीचे सिमकार्ड किमती १०,०००/—रू. व ट्रक क्र. एम.एच. ४९/ बी.झेड—५१६४ च्या चालकाचे ताब्यातून १) १० ब्रास रेती किमती ६०,०००/—रू. २) ट्रक क्र. एम.एच. ४९/ बी.झेड—५१६४ किमती ४०,००,०००/—रू. ३) टेक्नो स्पार्क कंपनीचा निळसर आकाशी रंगाचा मोबाईल ज्यामध्ये जियो कंपनीचे सिमकार्ड, एयरटेल कंपनीचे सिमकार्ड किंमती ६,०००/—रू. असा एकुण ५१,१२,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यातील आरोपीतांनी संगनमत करून मालकांचे सांगणेवरून सदर ट्रकमध्ये अवैधरित्या रेती विनापरवाना चोरटी वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीचे कृत्य के नमुद

कलमान्वये होत असल्याने आरोपी क्र. १) सचिन भोंदुजी वांढरे वय ३१ वर्ष रा. वाडी मोहल्ला जाखेगाव मौदा ता. कामठी जिल्हा नागपुर फरार आरोपी क्र. २) रामचंद्र शाहू वय २८ वर्ष रा. माथनी ता. मौदा जिल्हा नागपुर ३) अर्जुन पप्पु जाधव वय ४२ वर्ष रा. प्लॉट नं. २९ नविन नगर पारडी नागपुर ४) प्रमोद प्रकाश पवार वय २१ वर्ष रा. नविन नगर पारडी नागपुर ५) विनोद शेषराव भोयर रा. भरत नगर नागपुर यांचे विरुद्ध कलम ३७९, ३४, १०९ भादवि सहकलम ४८(८) महसुल अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर